# मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग
जा.क्र. मनपा/घ.व्य.वि./३४४/२०२४-२५
दिनांक :-०९/०८/२०२४

प्रति,
1. सिस्टीम मॅनेजर
नागरी सुविधा केंद्र

2. जनसंपर्क अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- जाहिर आवाहन प्रसिध्द करणेबाबत करणेबाबत**

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभुमिमध्ये जमा असलेले अस्थी कलश संबंधितांच्या नातेवाईकांनी 07 दिवसात घेऊन जावे याबाबतचे जाहिर आवाहन वृत्तपत्रात व महानगरपालिका संकेतस्थळावर प्रसिध्द करून नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणे आवश्यक आहे.

तरी, सोबत जोडलेले जाहिर आवाहन वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावे.

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि. ठाणे. - 401 101

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

जा.क्र. मनपा/घ.व्य./३४४/2024-25 दि.०९/०८/2024

## // जाहिर आवाहन //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन, मोर्वागाव, राईगाव, मुर्धागाव, भाईंदर (प.) भोलानगर, भाईंदर (पुर्व) बंदरवाडी, गोडदेव, नवघर, मिरारोड, पेणकरपाडा, काशिगाव, घोडबंदर गाव, रेतीबंदर व चेना गाव स्मशानभुमिमध्ये नागरीकांद्वारे प्रेत दहन करण्यात येत आहे. सदर प्रेत दहनातुन निघालेली काही अस्थी कलश संबंधितांच्या नातेवाईकांनी घेऊन न गेल्यामुळे स्मशानभुमितच जमा असल्याचे निदर्शनास आले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभुमिमध्ये जमा असलेले अस्थी कलश संबंधितांच्या नातेवाईकांनी 07 दिवसात घेऊन जावे, असे महानगरपालिकेतर्फे आवाहन करण्यात येत आहे. सदर अस्थी कलश 07 दिवसात घेऊन न गेल्यास महानगरपालिकेमार्फत त्याचे विधीवत विसर्जन करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner